वंदु मोरया . . .
घेण्या आधी हाती   योजियल्या कार्या
वंदु मोरया   जयदेवा गणराया

एकमेव तू   दैवत आमुचे
अभीष्ट चिंतन   करिशी सर्वांचे
मांदार शमी शेंदूर   अन् दुर्वेच्या ताटी
चंदनाची तुज   लावितो उटी . . . वंदु मोरया

कोटी सूर्यसिम   तव तेजोमय कांती
सुखकर्त्या दुखहर्त्या   तुज सारे ध्याती
चराचराचा तू   परशुधर पालक
विष्णूसह सारे   तव झालो मूषक . . . वंदु मोरया

देवा स्वानंदा   कुंकुमशेखरा
करूणासागरा   विद्यादातारा
मुक्ताफळमाळ   विराजे तव कंठी
गानचतुरा तुझी   गातो आरती . . . वंदु मोरया

मंगलनिधी तू   मूर्ती वरदाची
नच आम्हा भीती   कुठल्याही विघ्नाची
वक्रतुंडा तू   विकट महाकाया
मनोभावे तुझ्या   पडतो मी पाया . . . वंदु मोरया

## सवाष्ण येता गौरी

श्रावण जाता सरता सरी, . . . उमलुनी
उमटती हळदीची पाऊले दारी
सवाष्ण येता गौरी घरी

हिरव्या शालूवर सोनेरी . . . पदरावरुनी
कांठ खुले भरजरी
पिवळ्या चोळीवरी
सौभाग्याची भरीत शिदोरी

प्राजक्ताना गुंफुन हारी . . . पर्णफुलानी
चौरंगावर साज उभारी
सौख्याची ओटी भरण्या संसारी
कुंकुम लावण्या जन्मभरी